महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांकः अनुवि ४९१८/(४२/१८)/अर्थसंकल्प,

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय विस्तार भवन,
मुंबई - ४०० ०३२.
तारीख: २० मार्च, २०१९.

संदर्भ : -

१) वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्रमांकः अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थसं-३, दि. २ एप्रिल, २०१८
२) शासन निर्णय क्र. अनुवि ४९१८/(४२/१८)/अर्थसंकल्प, दिनांक ४ एप्रिल, २०१८
३) शासन निर्णय क्र. अनुवि ४९१८/(४२/१८)/अर्थसंकल्प, दिनांक २४ मे, २०१८
४) शासन निर्णय क्र. अनुवि ४९१८/(४२/१८)/अर्थसंकल्प, दिनांक २२ जून, २०१८
५) शासन निर्णय क्र. अनुवि ४९१८/(४२/१८)/अर्थसंकल्प, दिनांक २६ जुलै, २०१८
६) वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्रमांकः पूरक-२०१८/प्र.क्र.९५/अर्थसं-३, दि. २७ जुलै, २०१८
७) शासन शुध्दीपत्रक क्र. अनुवि ४९१८/(४२/१८)/अर्थसंकल्प, दि. २१ ऑगस्ट, २०१८
८) शासन निर्णय क्र. अनुवि ४९१८/(४२/१८)/अर्थसंकल्प, दिनांक २९ सप्टेंबर, २०१८
९) शासन निर्णय क्र. अनुवि ४९१८/(४२/१८)/अर्थसंकल्प, दि. २५ ऑक्टोबर, २०१८
१०) शासन निर्णय क्र. अनुवि ४९१८/(४२/१८)/अर्थसंकल्प, दि. २७ नोव्हेंबर, २०१८
११) वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्रमांकः पूरक-२०१८/प्र.क्र.१३५/अर्थसं-३, दि. ५ डिसेंबर, २०१८
१२) शासन निर्णय क्र. अनुवि ४९१८/(४२/१८)/अर्थसंकल्प, दि. १८ डिसेंबर, २०१८
१३) शासन निर्णय क्र. अनुवि ४९१८/(४२/१८)/अर्थसंकल्प, दि. १ जानेवारी, २०१९
१४) शासन निर्णय क्र. अनुवि ४९१८/(४२/१८)/अर्थसंकल्प, दि. ८ जानेवारी, २०१९
१५) शासन निर्णय क्र. पुनर्वि २८१९/(३/१९)/अर्थसंकल्प,दिनांक १५ जानेवारी, २०१९
१६) शासन निर्णय क्र. पुनर्वि २८१९/(३/१९)/अर्थसंकल्प,दिनांक १८ जानेवारी, २०१९
१७) शासन निर्णय क्र. अनुवि ४९१८/(४२/१८)/अर्थसंकल्प, दि. २१ जानेवारी, २०१९
१८) वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्रमांकः अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि. २५ जानेवारी, २०१९
१९) शासन निर्णय क्र. पुनर्वि २८१९/(३/१९)/अर्थसंकल्प,दिनांक ३० जानेवारी, २०१९
२०) शासन निर्णय क्र. अनुवि ४९१८/(४२/१८)/अर्थसंकल्प, दि. ३० जानेवारी, २०१९
२१) शासन निर्णय क्र. अनुवि ४९१८/(४२/१८)/अर्थसंकल्प, दि. ५ फेब्रुवारी, २०१९
२२) शासन शुध्दीपत्रक क्र. अनुवि ४९१८/(४२/१८)/अर्थसंकल्प, दि. ७ फेब्रुवारी, २०१९
२३) शासन निर्णय क्र. अनुवि ४९१८/(४२/१८)/अर्थसंकल्प, दि. १३ फेब्रुवारी, २०१९
२४) शासन निर्णय क्र. पुनर्वि २८१९/(३/१९)/अर्थसंकल्प,दिनांक १४ फेब्रुवारी, २०१९
२५) शासन निर्णय क्र. अनुवि ४९१८/(४२/१८)/अर्थसंकल्प, दि. १४ फेब्रुवारी, २०१९
२६) शासन निर्णय क्र. अनुवि ४९१८/(४२/१८)/अर्थसंकल्प, दि. १६ फेब्रुवारी, २०१९
२७) शासन निर्णय क्र. अनुवि ४९१८/(४२/१८)/अर्थसंकल्प, दि. २८ फेब्रुवारी, २०१९
२८) शासन निर्णय क्र. अनुवि ४९१८/(४२/१८)/अर्थसंकल्प, दि. ६ मार्च, २०१९

२९) वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्रमांकः पूरक-२०१९/प्र.क्र.४१/अर्थसं-३, दि. ८ मार्च, २०१९
३०) वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्रमांकः अर्थसं-२०१९/प्र.क्र.४२/अर्थसं-३, दि. ८ मार्च, २०१९
३१) शासन निर्णय क्र. अनुवि ४९१८/(४२/१८)/अर्थसंकल्प, दि. ११ मार्च, २०१९
३२) शासन निर्णय क्र. अनुवि ४९१८/(४२/१८)/अर्थसंकल्प, दि. १४ मार्च, २०१९
३३) शासन निर्णय क्र. अनुवि ४९१८/(४२/१८)/अर्थसंकल्प, दि. १८ मार्च, २०१९

प्रस्तावना -

वित्त विभागाकडून उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये बीम्स प्रणालीवर प्राप्त झालेला अनुदानाचा निधी नियंत्रक अधिकारी (आयुक्त - शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे, आयुक्त - क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे व सह सचिव (प्रशासन), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई) यांना वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील शालेय शिक्षण व क्रीडा विभागासाठी अर्थसंकल्पित झालेला व वित्त विभागाकडून BEAMS प्रणालीवर प्राप्त झालेला निधी पुढीलप्रमाणे नियंत्रक अधिकाऱ्यांच्या अधिनस्त ठेवण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे.

(रुपये हजारात)

अ.क्र.	लेखाशिर्ष	नियंत्रक अधिकारी	वितरीत अनुदान
	मागणी क्रमांक ई - २, २२०२ सर्वसाधारण शिक्षण		
१	२२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०२ माध्यमिक शिक्षण - १०७, शिष्यवृत्त्या (०१) माध्यमिक शाळांमधील शिष्यवृत्त्या (०१) (०१) ग्रामिण भागातील प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शिष्यवृत्ती (२२०२०३४२)	आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे	३५८.८
२	२२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०२ माध्यमिक शिक्षण - १०७, शिष्यवृत्त्या (०१) माध्यमिक शाळांमधील शिष्यवृत्त्या (०१) (०२) खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती (पूर्व माध्यमिक शाळा) (२२०२०३५१)	आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे	२६४१.५
३	२२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०२ माध्यमिक शिक्षण - १०७, शिष्यवृत्त्या (०३) शिष्यवृत्त्या (०३) (०२) प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना सहाय्य (२२०२०३८९)	आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे	२५५
४	२२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०२ माध्यमिक शिक्षण - १०७, शिष्यवृत्त्या (०३) शिष्यवृत्त्या (०३) (०१) कनिष्ठ महाविद्यालयातील शिष्यवृत्त्या (२२०२०३७१)	आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे	१४२२.९
५	२२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०५ भाषा विकास - १०३ संस्कृत शिक्षण (००) (००) (०१) माध्यमिक शाळांमध्ये भारत सरकारची शिष्यवृत्ती (२२०२१०६२)	आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे	१२०
६	२२०२, सर्वसाधारण शिक्षण, ८०, सर्वसाधारण १०७, शिष्यवृत्त्या (००) (००) (०७) आर्थिकदृष्टया मागासलेल्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती (२२०२१२५१)	आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे	७५६.६

अ.क्र.	लेखाशिर्ष	नियंत्रक अधिकारी	वितरीत अनुदान
७	२२०२, सर्वसाधारण शिक्षण, ८०, सर्वसाधारण, ८००, इतर खर्च (०२) संकीर्ण (०२) (०६) प्राथमिक शिक्षकांच्या मुलांना मोफत शिक्षण (अर्थोपाय अग्रिमाशी समायोजन) (२२०२१४२९)	आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे	३१९२
८	२२०२, सर्वसाधारण शिक्षण, ८०, सर्वसाधारण, ८००, इतर खर्च (०२) संकीर्ण (०२) (११) ज्यांचे किंवा ज्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रुपये १५,००० पेक्षा अधिक नाही अशा इयत्ता दहावी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना (मुलांना) फी माफी (अर्थोपाय अग्रिमाशी समायोजन) (२२०२१४७४)	आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे	५१०७.२
९	२२०२, सर्वसाधारण शिक्षण, ८०, सर्वसाधारण, ८००, इतर खर्च (०२) संकीर्ण (०२) (१५) माजी सैनिकांच्या मुलांना शैक्षणिक सवलत (अर्थोपाय अग्रिमाशी समायोजन) (२२०२१५०९)	आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे	१४६.१
१०	२२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०२ माध्यमिक शिक्षण - १०७, शिष्यवृत्त्या (०२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ याच्या कलम १८२ अन्वये जिल्हा परिषदांना सप्रयोजन अनुदाने (०२) (०१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ याच्या कलम १८२ अन्वये जिल्हा परिषदांना सप्रयोजन अनुदाने (उच्च माध्यमिक शाळा) (२२०२२३१८)	आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे	२१०२४.९
११	२२०२, सर्वसाधारण शिक्षण, ८०, सर्वसाधारण, ८००, इतर खर्च (०२) संकीर्ण (०२) (१७) इयत्ता बारावीपर्यंत मुलींना मोफत शिक्षण (२२०२२५२३)	आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे	७५३२.१
१२	२२०२, सर्वसाधारण शिक्षण, ८०, सर्वसाधारण, ८००, इतर खर्च (०२) संकीर्ण (०२) (४२) माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, तसेच शिक्षणशास्त्र पदविका विद्यालयातील अध्यापकांच्या व अध्यापकेत्तर कर्मचारी वर्गाच्या मुलांना मोफत शिक्षण (२२०२२९२६)	आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे	१२१४.८
१३	२२०२, सर्वसाधारण शिक्षण, ८०, सर्वसाधारण ८००, इतर खर्च (०२) संकीर्ण (०२) (४४) विद्यार्थ्यांना इयत्ता दहावी पर्यंत मोफत शिक्षण (२२०२ ३०५६)	आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे	५०००
१४	२२०२, सर्वसाधारण शिक्षण, ८०, सर्वसाधारण, ८००, इतर खर्च पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (०२) संकीर्ण (०२) (५०) विदर्भातील शेतकऱ्यांच्या	आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे	३७१२.६

अ.क्र.	लेखाशिर्ष	नियंत्रक अधिकारी	वितरीत अनुदान
	आत्महत्या रोखण्यासाठी त्यांच्या मुलांना शैक्षणिक सवलत (२२०२H१५१)		
१५	२२०२, सर्वसाधारण शिक्षण, ८०, सर्वसाधारण, ००३, प्रशिक्षण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (०१) (०३) शिक्षकांचे प्रशिक्षण (केंद्र पुरस्कृत योजना) (केंद्र हिस्सा) (२२०२३०२९)	आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे	१७९९९
१६	२२०२, सर्वसाधारण शिक्षण, ८०, सर्वसाधारण, ००३, प्रशिक्षण पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (०१) (०४) शिक्षकांचे प्रशिक्षण (केंद्र पुरस्कृत योजना) (राज्य हिस्सा) (२२०२३७८२)	आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे	११९९९
१७	२२०२, सर्वसाधारण शिक्षण, ८० सर्वसाधारण, ००३ प्रशिक्षण, (०१) शिक्षकांचे प्रशिक्षण, (०१) (०६) शिक्षक प्रशिक्षण (अनुसूचित जाती उप योजना) (केंद्र हिस्सा) (२२०२I०५८)	आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे	३५३२
१८	२२०२, सर्वसाधारण शिक्षण, ८० सर्वसाधारण, ००३ प्रशिक्षण, (०१) शिक्षकांचे प्रशिक्षण, (०१) (०५) शिक्षक प्रशिक्षण (अनुसूचित जाती उप योजना) (राज्य हिस्सा) (२२०२I०६७)	आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे	२३५५
१९	२२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०१ प्राथमिक शिक्षण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना - केंद्र पुरस्कृत योजना, ८०० , इतर खर्च, (००) (१२) सर्व शिक्षा अभियान (केंद्र हिस्सा) (२२०२I०४९)	सह सचिव (प्रशासन) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई	१२५८८७१
२०	२२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०१ प्राथमिक शिक्षण, ८००, इतर खर्च (००) (००) (०५) सर्व शिक्षा अभियान योजना (केंद्र पुरस्कृत योजना) (राज्य हिस्सा) (२२०२३०४७)	सह सचिव (प्रशासन) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई	८३९२४७.३३३
२१	२२०२, सर्वसाधारण शिक्षण, ८०, सर्वसाधारण ८००, इतर खर्च पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (०२) संकीर्ण (०२) (५१) ई-गव्हर्नन्स कार्यक्रम (२२०२H४५४)	आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे	४२९७.९२८
	मा.क्र. ई - ५, ७६१० शासकीय कर्मचारी इ.कर्जे		
२२	७६१०, शासकीय कर्मचारी, इत्यादींना कर्जे, २०१, घरबांधणी अग्रिमे (००) (००) (०१) घरबांधणी अग्रिमे (७६१००२५६) ५५, कर्जे व आगाऊ रकमा	सह सचिव (प्रशासन) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई	१०५०
२३	७६१०, शासकीय कर्मचारी, इत्यादींना कर्जे, २०१, घरबांधणी अग्रिमे (००) (००) (०१) घरबांधणी अग्रिमे (७६१००२५६) ५५, कर्जे व आगाऊ रकमा	आयुक्त (क्रीडा व युवक सेवा) महाराष्ट्र राज्य, पुणे	९६९८.५२०

अ.क्र.	लेखाशिर्ष	नियंत्रक अधिकारी	वितरीत अनुदान
२४	७६१०, शासकीय कर्मचारी, इत्यादींना कर्जे, २०२, मोटार वाहन खरेदी अग्रिमे (००) (००) (०१) मोटार वाहन खरेदी अग्रिमे (७६१००२६५) ५५, कर्जे व आगाऊ रकमा	आयुक्त (क्रीडा व युवक सेवा) महाराष्ट्र राज्य, पुणे	२८०
२५	७६१०, शासकीय कर्मचारी, इत्यादींना कर्जे, २०२, मोटार वाहन खरेदी अग्रिमे (००) (००) (०१) मोटार वाहन खरेदी अग्रिमे (७६१००२६५) ५५, कर्जे व आगाऊ रकमा	आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे	५९७

२. सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षात वितरीत केलेला उपरोक्त निधी / अनुदान आंहरण व संवितरण अधिकाऱ्यांना खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून तातडीने वितरीत करण्यात यावा :-

१) ज्या उद्देशासाठी निधी / अनुदान मंजूर आहे त्या व्यतिरिक्त इतर उद्देशासाठी खर्च करता येणार नाही. तसेच इतर लेखाशिर्षाकडे वळती करता येणार नाही.

२) सदर खर्चाचा प्रगती अहवाल मासिक निधी विवरणपत्रानुसार नियंत्रक अधिकाऱ्यांनी दरमहा शासनास १० तारखेपर्यंत सादर करावा.

३) वेतनेत्तर अनुदान वितरीत करताना वित्त विभाग शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र. ३०/२०१३/विनियम, दिनांक १७ एप्रिल, २०१५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-१, उपविभाग एक मधील अनुक्रमांक ६, नियम ४० प्रमाणे सक्षम प्राधिकाऱ्यांची मान्यता घेवून अनुदान अदा करावे.

४) वेतन अनुदानाची थकबाकी अदा करताना अनुक्रमांक ४, नियम ३९ (ब) टिप - ४, अनुक्रमांक ५, नियम ३९, (ब) टिप - ५ अन्वये तसेच अनुक्रमांक ६ नियम ४० प्रमाणे सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेवून अनुदान अदा करावे.

५) महानगरपालिका, नगरपालिका यांना देण्यात येणारी वेतनेत्तर अनुदाने वित्त विभागाच्या अनुमतीशिवाय खर्च करता येणार नाहीत.

६) खाजगी स्वंयसेवी संस्थांना अनुदान उपलब्ध करुन देताना वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-१, उपविभाग एक मधील अनुक्रमांक २७, नियम १४९ प्रमाणे सक्षम अधिकाऱ्याची मान्यता घेवून अनुदान अदा करावे.

७) ज्या तरतूदी वितरणासाठी प्रशासकीय मान्यता आदेशाची आवश्यकता आहे अशा तरतूदी वितरीत करताना भाग-१, उपविभाग-तीन, अनुक्रमांक-चार, नियम २७ (२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराप्रमाणे सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने आदेश निर्गमित झाल्यानंतर अनुदान वितरीत करावे.

८) जिल्हा परिषदांसाठीचे वेतनेत्तर अनुदान त्यांचे अनुदान निर्धारण झाल्याशिवाय वितरीत करु नये.

९) नवीन खर्चाच्या अनुषंगाने नवीन बाबीव्दारे तरतूद केलेल्या योजनांच्या निधी वितरणासंदर्भात वित्त विभागाची मान्यता आवश्यक आहे.

१०) विविध शासकीय / प्रशासकीय संस्थांना तसेच अनुदानित संस्थांना सहायक अनुदाने मंजूर करण्यापूर्वी त्यांचेकडून पूर्वी वितरीत केलेल्या अनुदानाच्या खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्रे विभागाने प्राप्त करावीत. तसेच ३ महिन्यांपूर्वी दिलेल्या अनुदानाचा ७५% विनियोग पूर्ण झाल्याशिवाय पुढील अनुदान वितरीत करण्यात येऊ नये. कोषागार अधिकाऱ्यांनी, सहायक अनुदानामधून निधी आहरित करण्यासाठी सादर केलेल्या देयकासोबत संबंधित संस्थेचे लगतच्या मागील महिन्यातील बँक अकाऊंट स्टेटमेंट (Bank Account Statement) ची प्रत जोडलेली नसल्यास देयक पारित करु नये.

११) शासनाव्दारे देण्यात येणारे वेतन अनुदान लाभार्थ्यांच्या बँक अकाऊंटमध्ये ECS व्दारे प्रदान करणे बंधनकारक राहील. कोणत्याही परिस्थितीत वेतन अनुदानाची रक्कम एकत्रितरीत्या व Offline पध्दतीने वितरीत करण्यात येऊ नये.

१२) स्थानिक स्वराज्य संस्था तसेच महामंडळे यांना अनुदान वितरीत करण्यापूर्वी सदर संस्थांकडून राज्य शासनास येणे असणाऱ्या रकमांचा आढावा घेण्यात यावा व त्या रकमा वसूल करुनच उर्वरीत अनुदान वितरीत करण्यात यावे. तसेच शासनाव्दारे सदर संस्थांना वितरीत केलेल्या अनुदानाचा विनियोग व अखर्चित रक्कम कुठे ठेवली आहे याबाबतची तपशीलवार माहिती एकत्रित करण्यात यावी. सदर अखर्चित निधी बँकेमध्ये ठेवलेला असल्यास त्याचे बँक अकाऊंट स्टेटमेंट (Bank Account Statement) शासनास सादर करावे. एखाद्या कार्यक्रमावरील खर्चासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला निधी अखर्चित असल्यास त्याच प्रयोजनासाठी चालू वर्षी वित्त विभागाच्या अनुमतीशिवाय निधी वितरीत करु नये.

१३) वैयक्तिक लाभार्थ्यांच्या कार्यक्रमाअंतर्गतची लाभार्थ्यांची देयके आहरित करतांना लाभार्थ्यांची यादी निश्चित करुन योग्य त्या तपशिलासह देयकासोबत जोडल्याशिवाय वैयक्तिक लाभार्थ्यांची अनुदाने आहरित करण्यात येऊ नयेत. वैयक्तिक लाभार्थ्यांचे कार्यक्रम आधार क्रमांकाशी संलग्न करण्यात यावीत व अनुदानाचे प्रदान इलेक्ट्रॉनिक्स क्लिअरन्स सिस्टीमनेच (ECS) करण्यात यावीत.

१४) शिष्यवृत्ती / शिक्षणशुल्काची प्रतिपूर्ती, वैयक्तिक लाभार्थी तसेच सवलतीपोटी दिलेले अनुदान इत्यादीची प्रदाने, इलेक्ट्रॉनिक्स क्लिअरन्स सिस्टीम (ECS) नेच अदा करण्यात यावीत. अशा सर्व बाबी आधार क्रमांकाशी संलग्न करण्यात याव्यात.

१५) बांधकाम विषयक प्रस्तावासंदर्भात प्रशासकीय मान्यता / तांत्रिक मान्यता तसेच आवश्यक तेथे सचिव समितीची मान्यता प्राप्त करुन कामनिहाय निधी अर्थसंकल्पीत करणे आवश्यक आहे. नवीन कामांबाबत निधीच्या उपलब्धतेची खात्री केल्यांनतरच कामाची निविदा सूचना काढून कार्यारंभ आदेश देण्यात येऊन काम सुरु करावे व आवश्यकतेप्रमाणे निधीचे वितरण करण्यात यावे. जुन्या कामांचा आढावा घेऊन ती प्राथम्याने पूर्ण करण्यात यावीत व हा निधी ठेव बांधकामाचे स्वरुपात सार्वजनिक बांधकाम विभागास प्रदान करु नये.

१६) केंद्र पुरस्कृत योजनेसंदर्भात केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झाल्याची खात्री संबंधित विभागाने नस्त्यांवर वित्त विभागाच्या अर्थोपाय शाखेकडून करुन घ्यावी (यासाठी व्यय / अर्थसंकल्प शाखेला नस्ती संदर्भीत करण्याची आवश्यकता नाही) व तदनंतर सदर निधी प्राप्त झाला असल्यास तसेच राज्य शासनाचा समरुप हिस्सा प्रशासकीय विभागाने त्यांचे स्तरावर वितरीत करावा. यासाठी नस्ती पुन्हा वित्त विभागास सहमतीसाठी वेगळयाने संदर्भीत करण्याची आवश्यक नाही. मात्र, मागील

वर्षामधील केंद्र शासनाचा निधी चालू वर्षी खर्च करावयाचा असल्यास त्यास वित्त विभागाची सहमती घेणे अनिवार्य राहील. केंद्र सहाय्यीत / केंद्र पुरस्कृत कार्यक्रम यांच्या अनुषंगाने अर्थसंकल्पीत करण्यात आलेला केंद्र व राज्य हिस्स्याचा निधी इतरत्र वळविण्यात येऊ नये.

१७) "शासकीय विभागाने करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची नियमपुस्तिका", उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने त्यांच्या क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दि. १.१२.२०१६ च्या शासन निर्णयान्वये प्रसिध्द केली आहे. सदर शासन निर्णय व त्यासोबतच्या मार्गदर्शक सूचनाप्रमाणे खरेदीप्रक्रीया पूर्ण करुन पुरवठादार निश्चित झाल्याशिवाय तसेच या मार्गदर्शक सूचनेतील अटींचे पालन करुन खरेदीची देयके कोषागारातून आहरित करण्यात यावीत. खरेदीविषयक धनादेश संबंधित पुरवठादाराच्याच नावांने व शक्यतो इलेक्ट्रॉनिक्स क्लिअरन्स सिस्टीमव्दारे (ECS) अदा करण्यात यावेत.

१८) अनेक वेळेला विभागांव्दारे संक्षिप्त देयकाव्दारे निधी खर्च करण्यात येतो. मात्र त्याचे तपशीलवार देयक सादर न केल्यामुळे लेखा आक्षेप येतात व अपहार संभवतात. तरी यापुढे विभागांनी ज्या लेखाशीर्षाखाली जुनी तपशीलवार देयके प्रलंबित असतील ती सादर केल्याशिवाय त्या लेखाशिर्षाखालील निधी वित्त विभागाच्या सहमतीशिवाय आहरित करु नये.

१९) विविध कारणांमुळे अखर्चित राहिलेला निधी विभागांनी त्यांच्या अधिनस्त महामंडळाकडे हस्तांतरीत करुन तांत्रिकदृष्टया खर्च झाल्याचे दाखविले जाते, ही एक प्रकारची अनियमितता आहे, याची विभागांनी नोंद घ्यावी. तसेच त्यांच्या अधिनस्त असलेला यापूर्वीचा अखर्चित निधी (स्वीय प्रपंजी खात्यातील / महामंडळाच्या खात्यातील वा इतर प्रकारे खर्च दर्शवून बाहेर ठेवण्यात आलेला) संपूर्णत: खर्च झाल्याशिवाय तरतुदी आहरीत वा वितरीत करु नयेत. याठिकाणी असेही निदर्शनास आणण्यात येते की, स्वीय प्रपंजी लेख्याखाली विभागांकडे बऱ्यांच मोठया प्रमाणावर निधी अखर्चित असल्याचे दिसून येते. सदर निधीचा ताळमेळ घालून व लेखा परिक्षण करुन निधी विहीत मुदतीत खर्च न झाल्यास तो शासनाच्या तिजोरीत परत करण्यात यावा. सदर अखर्चित निधी बँकेमध्ये ठेवलेला असल्यास त्याचे बँक अकाऊंट (Bank Account Statement) शासनास सादर करावे.

२०) विभागांमार्फत करण्यात येणारे संगणकीकरण संदर्भातील खर्च माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या क्रमांक मातसं/१७१६/प्र.क्र.२८६/३९ दिनांक ९ ऑगस्ट, २०१६ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार करण्यात यावा.

२१) थकित देयकांच्या प्रदानासाठी खर्च करण्यात येणाऱ्या प्रकरणी खरेदी केलेले साहित्य प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचे व त्याचे लेखे सुयोग्यरित्या ठेवल्याची खात्री पटल्याशिवाय तो निधी आहरित करण्यात येऊ नये.

३. सदर शासन निर्णय अर्थसंकल्प नियम पुस्तिका नियम १७ व नियम १४२, तसेच वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ मधील उपविभाग-एक नियम क्र. १४९ आणि वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थसंकल्प-३, दि. २ एप्रिल, २०१८ व दि. २५ जानेवारी, २०१९ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२०१७१२३१०४२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

DEEPAK VIJAY SHELAR

Digitally signed by DEEPAK VIJAY SHELAR
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=6cd30ed620a4fe01f24cb84cc86e70f3b8f6f1fdcdb2469570c78dabb9acf4ba, postalCode=400032, street=ROOM NO 4.4,ANNEX BLDG,SCHOOL EDUCATION DEPT.MANTRALAYA,MUMBAI, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=DEEPAK VIJAY SHELAR
Date: 2019.03.20 17:50:59 +05'30'

(दीपक वि. शेलार)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री (शालेय शिक्षण व क्रीडा) यांचे स्वीय सहायक
२. मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा / विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
३. मा. विधानसभा / विधानपरिषद सदस्य
४. अप्पर मुख्य सचिव (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग) यांचे स्वीय सहायक
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र - १ / २, मुंबई / नागपूर
६. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र - १ / २, मुंबई / नागपूर
७. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
९. स्थानिक निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१०. वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे
११. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१२. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
१३. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नीरोड, मुंबई
१४. सहसचिव / उपसचिव (विद्यार्थी विकास / शाळा व्यवस्थापन / शिक्षक शिक्षकेतर / प्रशासन / समन्वय / अर्थसंकल्प / क्रीडा) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. शिक्षण संचालक (माध्य. व उच्च माध्य. / प्राथमिक / प्रौढ व अल्पसंख्यांक / SCERT / महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद) महाराष्ट्र राज्य, पुणे
१६. अध्यक्ष, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, महाराष्ट्र राज्य, पुणे
१७. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे
१८. सर्व क्रीडा उपसंचालक
१९. सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी
२०. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
२१. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद
२२. सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक / प्रौढ)
२३. सर्व अधिक्षक, वेतन पथक (प्राथमिक / माध्यमिक)
२४. वित्त विभाग (व्यय-५ / व्यय-१४ / अर्थसंकल्प - ८) मंत्रालय, मुंबई
२५. सर्व कार्यासने, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
२६. निवड नस्ती, कार्यासन अर्थसंकल्प, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.